2331/C

शि पु प्र म

आजचे घरकुल, करील भविष्य उज्वल !

# शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित

(महाराष्ट्र शासनाच्या संपूर्ण मालकीची
CIN No. : ७०२००MH१९९८SGC११६६६४
५ वा माळा, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू), मुंबई - ४०० ०५१
दुरध्वनी क्र. ६९२०६९२०
ई मेल:sppl_mumbai@rediffmail.com वेबसाईट:www.spplmmr.org
संपर्क : ०२२- ६९२० ६९२०/६९२० ६९०२

**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित या कार्यालयामध्ये शासकीय / निमशासकीय / शासन अंगीकृत उपक्रमांमधून सेवानिवृत्त किंवा खाजगी क्षेत्रातील समतुल्य /तत्सम पदाचा अनुभव असलेल्या अधिकाऱ्यांमधून निवड पध्दतीने थेट "विवक्षित कामांसाठी" करार पध्दतीने प्रथमतः ११ महिन्यांकरिता पदे भरणेबाबत जाहिरात.**

| अ. क्र. | पदाचे नाव, शैक्षणिक अर्हता व अनुभव | | एकूण पदे |
|---|---|---|---|
| १ | **पदाचे नाव : कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)** | | ०४ |
| | • **शैक्षणिक पात्रता :-** | शासन मान्य विद्यापीठाची अथवा तत्सम संस्थेची स्थापत्य' विषयातील पदव्युत्तर पदवी. | |
| | • **पात्रता/ निकष :-** | शासकीय / निमशासकीय कार्यालयातील कनिष्ठ अभियंता किंवा तत्सम पदावर काम केलेले अधिकारी.<br>किंवा<br>खाजगी क्षेत्रातील कनिष्ठ अभियंता किंवा समतुल्य किंवा तत्सम पदाचा अनुभव असलेले उमेदवार. | |
| | • **अनुभव :-** | उमेदवारास किमान ०१ वर्षे अनुभव असावा. मुंबई महानगर प्रदेशातील गृहनिर्माण या विषयाबाबतचा अनुभव असलेले राज्य शासन अधिनस्त, निमशासकीय कार्यालयात व स्थानिक स्वराज्य संस्था अधिनस्त स्थापत्य अभियांत्रिक शाखेत या पदाचा किमान ३ वर्षापेक्षा जास्त प्रत्यक्ष कामकाज हाताळण्याचा अनुभव असावा. | |
| | • **वयोमर्यादा :-** | खाजगी क्षेत्रातील अर्जदाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. | |
| | • **एकत्रित मानधन** | अंदाजित एकत्रित मानधन रु. /- | |
| | • **कामाचे स्वरुप :-** | झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व परवडणा-या घरांचे प्रकल्प यांच्या अंमलबजावणी प्रयोजनार्थ अभियांत्रिकी शाखेतील सर्व कामकाज व जबाबदाऱ्या पार पाडणे.<br>शिपुप्रमच्या विविध योजनांच्या अनुंषगीक कामे, कामकाजाकरीता तसेच शिपुप्रम आणि संबंधित इतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात समन्वय साधून आवश्यक ती सर्व कामे करणे | |



Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | पदाचे नाव, शैक्षणिक अर्हता व अनुभव | | एकूण पदे |
|---|---|---|---|
| | **पदाचे नाव : उप अभियंता (स्थापत्य)** | | |
| | | शासन मान्य विद्यापीठाची अथवा तत्सम संस्थेची स्थापत्य'' विषयातील पदव्युत्तर पदवी. | |
| | **पात्रता/ निकष :-** | शासकीय / निमशासकीय कार्यालयातील उप अभियंता (स्थापत्य) किंवा तत्सम पदावर काम केलेले अधिकारी.<br>किंवा<br>खाजगी क्षेत्रातील उप अभियंता (स्थापत्य)किंवा समतुल्य किंवा तत्सम पदाचा अनुभव असलेले उमेदवार. | |
| | **अनुभव :-** | उमेदवारास किमान ०७ वर्ष अनुभव असावा. मुंबई महानगर प्रदेशातील गृहनिर्माण या विषयाबाबतचा अनुभव असलेले राज्य शासन अधिनस्त, निमशासकीय कार्यालयात व स्थानिक स्वराज्य संस्था अधिनस्त स्थापत्य अभियांत्रिकी शाखेतील या पदाचा किमान ०७ वर्षापेक्षा जास्त प्रत्यक्ष कामकाज हाताळण्याचा अनुभव असावा. | |
| | **वयोमर्यादा :-** | सेवानिवृत्त अर्जदाराचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.<br>खाजगी क्षेत्रातील अर्जदाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. | |
| | **एकत्रित मानधन** | अंदाजित एकत्रित मानधन रु. /- | |
| | **कामाचे स्वरुप :-** | झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व परवडणा-या घरांचे प्रकल्प यांच्या अंमलबजावणी प्रयोजनार्थ अभियांत्रिकी शाखेतील सर्व कामकाज व जबाबदाऱ्या पार पाडणे.<br>शिपुप्रमच्या विविध योजनांच्या अनुषंगीक कामे, कामकाजाकरीता तसेच शिपुप्रम आणि संबंधित इतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात समन्वय साधून आवश्यक ती सर्व कामे करणे | |
| | | | |
| | **पदाचे नाव : कार्यकारी अभियंता (स्थापत्य)** | | |
| | **पात्रता/ निकष :-** | शासकीय / निमशासकीय कार्यालयातील कार्यकारी अभियंता किंवा तत्सम पदावर काम केलेले अधिकारी.<br>किंवा<br>खाजगी क्षेत्रातील कार्यकारी अभियंता किंवा समतुल्य किंवा तत्सम पदाचा अनुभव असलेले उमेदवार. | |
| | **अनुभव :-** | उमेदवारास किमान १० वर्ष अनुभव असावा. मुंबई महानगर प्रदेशातील गृहनिर्माण या विषयाबाबतचा अनुभव असलेले राज्य शासन अधिनस्त, निमशासकीय कार्यालयात व स्थानिक स्वराज्य संस्था अधिनस्त स्थापत्य अभियांत्रिक शाखेत या पदाचा किमान १० वर्षापेक्षा जास्त प्रत्यक्ष कामकाज हाताळण्याचा अनुभव असावा. | |
| | **वयोमर्यादा :-** | सेवानिवृत्त अर्जदाराचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.<br>खाजगी क्षेत्रातील अर्जदाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. | |
| | **एकत्रित मानधन** | अंदाजित एकत्रित मानधन रु. /- | |
| | **कामाचे स्वरुप :-** | झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व परवडणा-या घरांचे प्रकल्प यांच्या अंमलबजावणी प्रयोजनार्थ अभियांत्रिकी शाखेतील सर्व कामकाज व जबाबदाऱ्या पार पाडणे.<br>शिपुप्रमच्या विविध योजनांच्या अनुषंगीक कामे, कामकाजाकरीता तसेच शिपुप्रम आणि संबंधित इतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात समन्वय साधून आवश्यक ती सर्व कामे करणे | |
| | | | |



Scanned with OKEN Scanner

| अ. क्र. | पदाचे नाव, शैक्षणिक अर्हता व अनुभव | एकूण पदे |
|---|---|---|
| | | |

**पदाचे नाव : व्यवस्थापक प्रकल्प मुल्यामापन**

| | |
|---|---|
| **शैक्षणिक पात्रता :-** | शासन मान्य विद्यापीठाची अथवा तत्सम संस्थेची स्थापत्य'' विषयातील पदव्युत्तर पदवी. |
| **पात्रता/ निकष :-** | शासकीय / निमशासकीय कार्यालयातील व्यवस्थापक प्रकल्प मूल्यमापन किंवा तत्सम पदावर काम केलेले अधिकारी.<br>किंवा<br>खाजगी क्षेत्रातील व्यवस्थापक प्रकल्प मूल्यमापन किंवा समतुल्य किंवा तत्सम पदाचा अनुभव असलेले उमेदवार किंवा राज्य शासनाचे नगररचना विभागातील सहाय्यक संचालक नगररचना विभागातील सहाय्यक संचालक नगररचना पदावरील अनुभव असलेले उमेदवार. |
| **अनुभव :-** | १. शासकीय/निमशासकीय सेवेतून निवृत्त झालेल्या महानगरपालिकेतील अथवा राज्य शासनाचे नगररचना विभागातील सहाय्यक संचालक नगररचना विभागातील सहाय्यक संचालक नगररचना पदावरील किमान ५ वर्षाचा अनुभव व नगररचना पदावरील किमान १० वर्षाचा अनुभव आवश्यक आहे.<br>२. पदव्युततर पदवी(M.TECT CIVIL) धारकास विशेष प्राधान्य देण्यात येईल. |
| **वयोमर्यादा :-** | सेवानिवृत्त अर्जदाराचे वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे.<br>खाजगी क्षेत्रातील अर्जदाराचे वय ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. |
| **एकत्रित मानधन** | सामान्य प्रशासन विभाग यांच्या शासन निर्णय दि.१०/०७/२०२५ नुसार मासिक पारिश्रमिक निश्चित केले जाईल. |
| **कामाचे स्वरुप :-** | झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प व परवडणा-या घरांचे प्रकल्प यांच्या अंमलबजावणी प्रयोजनार्थ सर्व कामकाज व जबाबदाऱ्या पार पाडणे. शिपुप्रमच्या विविध योजनांच्या अनुषगीक कामे, कामकाजाकरीता तसेच शिपुप्रम आणि संबंधित इतर शासकीय व निमशासकीय कार्यालयात समन्वय साधून आवश्यक ती सर्व कामे करणे. शासकीय /निमशासकीय कार्यालयात नगर रचनाकर किंवा समकक्ष पदाचा अनुभव असलेले उमेदवार. शिपुप्रमकडे येणा-या सर्व प्रकल्पांचे मुल्यमापन करणे, प्रकल्प अंमलबजावणीस उचित आहे किंवा कसे याबाबत शिफारस करणे. |

**टिप :-**

- भरती प्रक्रिया अंशतः/ पूर्णतः रद्द करण्याचे अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक/शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.



Scanned with OKEN Scanner

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

| | |
|---|---|
| १. | उपरोक्त पदाकरिता निर्धारीत केलेली आवश्यक अर्हता, अनुभव धारण करतात अशा इच्छुक उमेदवारांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. |
| २. | उमेदवारांना मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक. (याबाबत माध्यमिक शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र सादर करावे.) |
| ३. | करार पध्दतीने नियुक्ती झालेल्या अर्जदारास नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व अटी व शर्ती मान्य आहेत, तसेच सेवा समावेशनाचे अथवा सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ, हक्क किंवा अधिकार असणार नाहीत याबाबतचे उमेदवाराने बंधपत्र देणे बंधनकारक राहील. |
| ४. | उपरोक्त संवर्गातील पदांकरीता नमुद केलेले वय, शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे **दि. ३० मार्च, २०२६** रोजीची वैध असतील. त्यानंतरची प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. |
| ५. | कोणतेही कारणे न देता जाहीरातीमधील रिक्त पदाच्या संचयोत बदल करणे, पदभरती स्थगित करणे/रदद करणे व पदभरती प्रक्रिया याबाबतचे सर्व अधिकार तसेच प्राप्त अर्ज अंशत: किंवा पूर्ण किंवा सर्व अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक/शिपुप्रम कडे राखून ठेवत आहे. |
| ६. | दिनांक १५/०४/२०२६ रोजी दुपारी ३:०० वाजता थेट मुलाखत (Walk In Interview) मुळ कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी तपासणसाठी सादर करणे अनिर्वाय आहे. |
| ७. | मुळ प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती स्वयंसाक्षांकित (Self Attested) करुन एक संच थेट मुलाखत (Walk In Interview) च्या वेळी सोबत आणावेत. सर्व कागदपत्रांच्या छायाप्रती स्पष्ट आणि सुवाच्य असाव्यात. |
| ८. | पात्रता सुचीनुसार गुणवत्तानिहाय नामिकासूचीतील उमेदवारांना मुलाखतीसाठी ई-मेल अथवा पत्र पाठविण्यात येईल व निवड समितीने निवड केलेल्या पात्र उमेदवाराला नियुक्तीपत्र निर्गमित करण्यात येईल. उर्वरीत उमेदवारांबरोबर कोणताही संपर्क साधला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. |
| ९. | निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास सदर उमेदवारास निवड व नियुक्तीच्या प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल. |
| १०. | अपूर्ण अर्ज रद्दबाबत ठरविण्यात येईल. |
| ११. | उपरोक्त कंत्राटी पदांचा सेवा कालावधी प्रथमत: ११ महिन्यांचा असेल मात्र या पुढील कालावधी त्यावेळची निकड, गरज तथा आवश्यकता पाहून संबंधीत अधिकाऱ्याची कार्यतत्परता आणि गुणवत्तेच्या आधारे सेवा कालावधीमध्ये अधिकतम तीन वर्षापर्यंत मात्र दरवर्षी नुतनीकरणाने सेवाखंडासह वाढ होऊ शकेल. |
| १२. | उपरोक्त कंत्राटी पदांवर निवड होणाऱ्या उमेदवारांना त्या पदासाठी नियमानुसार एकत्रित मानधन अनुज्ञेय राहील. (शासकीय /निमशासकीय सेवानिवृत्त उमेदवार वगळून) |
| १३. | अर्जामध्ये भरलेल्या माहितीच्या पृष्ठयर्थ उमेदवारांनी आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या स्वयं-साक्षांकीत प्रतींसह अर्जासोबत जोडणे आवश्यक / अनिवार्य आहेत. तसेच सर्व संबंधीत मूळ प्रमाणपत्रे पडताळणी / मुलाखतीच्या वेळेस सादर करणे अनिवार्य आहे. |
| १४. | उमेदवारांनी त्यांचे अर्ज, स्वयं घोषणापत्र, चारित्र्य प्रमाणपत्र हे या जाहिरातीसोबतच्या विहित नमुन्यामध्येच आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रती सादर कराव्यात. |
| १५. | **अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांनी त्यांचा अर्ज विहित मुदतीत शिपुप्रम या कार्यालयात पोहोचेल याची दक्षता व कटाक्षाने नोंद घ्यावी अन्यथा टपाल खात्याची दिरंगाई अथवा इतर अन्य कोणत्याही कारणामुळे विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार न करता ते आपोआपच रद्द ठरतील.** |
| १६. | निवड प्रक्रियेदरम्यान व तद्नंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद, अवैध अथवा अयोग्य / अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल. याबाबत मा. व्यवस्थापकीय संचालक/शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्यादित यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक असेल. तसेच याबाबत कोणलाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही. |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| १७. | करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेली नसावी. |
| १८ | करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) कंत्राटी कालावधी सुरु होण्यापूर्वी जाहिर करणे आवश्यक राहील. |
| १९ | करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने त्यांना कंत्राटी कालावधी दरम्यान प्राप्त होणारी कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील. सदर माहितीचा गैरवापर, दृष्टोत्पत्तीस आल्यास संबंधित अधिकारी व्यक्तीशः जबाबदार राहील. या माहितीची गोपनियता बाळगणे तसेच शिपुप्रमला कोणतीही हानी पोहचणार नाही, याची दक्षता, काळजी घेण्याची जबाबदारी या संबंधित अधिकाऱ्याची असेल. |
| २०. | करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील. |
| २१. | करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार असणार नाहीत. |
| २२. | नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा करार पध्दतीवरील अधिकाऱ्यांच्या सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील. |
| २३. | सक्षम प्राधिकारी यांना कंत्राटी अधिकारी यांची संशयास्पद वर्तणूक, हालचाल निदर्शनास आल्यास त्यांचा कंत्राटी सेवा कालावधी कोणतीही पूर्व सूचना न देता तात्काळ समाप्त करण्यात येईल. |
| २४. | सेवा समाप्तीनंतर संबंधित कंत्राटी अधिकारी यांनी त्यांच्या ताब्यात असलेली सर्व कागदपत्रे, दस्तऐवज, माहिती तसेच कार्यालयीन ओळखपत्र ताबडतोब संबंधित विभाग प्रमुखाकडे हस्तांतरीत करावेत. |
| २५. | **उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यामध्ये शिक्षा दिली असल्यास तो भरतीसाठी अपात्र ठरेल. उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी/ न्यायालयीन प्रकरण प्रलंबित असल्यास/ शिक्षा झालेली असल्यास, उमेदवाराने त्याबाबतचा तपशील देणे आवश्यक आहे याबाबत निवड प्रक्रियेदरम्यान किंवा तद्नंतर सदर बाब निदर्शनास आल्यास उमेदवार तात्काळ अपात्र ठरेल.** |
| २६. | उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता त्याला कंत्राटी सेवेतून कमी करण्यात येईल. |
| २७. | गुणवत्तेच्या आधारे तयार केलेली प्रतिक्षासुची आवश्यतेनुसार परंतु जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत ग्राह्य धरण्यात येईल. तद्नंतर आपसूकच ती रद्द होईल. |
| २८. | निवड यादी उमेदवाराच्या मूळ शैक्षणिक, अनुभव व इतर अनुषंगिक प्रमाणपत्राच्या पडताळणी सापेक्ष असेल. उमेदवाराने आवश्यक मूळ प्रमाणपत्रे पडताळणीकरीता नियत दिनांकास सादर न केल्यास त्याचे नाव निवड यादीतून रद्द करण्यात येईल व नंतर याबाबत कोणत्याही विनंतीची दखल घेण्यात येणार नाही. विहीत अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांनी, उपरोक्त अटींची पूर्तता होत आहे याची खातरजमा करूनच अर्ज भरावेत. |
| २९. | शासनाने भरतीबाबत / नियुक्तीबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना व शासन निर्णय, परिपत्रके, आदेश इत्यादी या भरती प्रकियेला लागू राहतील. |
| ३०. | उमेदवारांनी नियुक्तीपूर्वी खाली नमुद केलेली शैक्षणिक प्रमाणपत्रे / कागदपत्रे यांच्या मूळ प्रती तपासणीसाठी नियुक्ती शिपुप्रम या कार्यालयाकडे सादर करणे आवश्यक आहे. |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| | • शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला / अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)<br>• माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी.), उच्च माध्यमिक शालांत परिक्षा (एच.एस.सी.) व पदवी/पदव्युत्तर पदवी परीक्षा यांच्या गुणपत्रिका व उत्तीर्णतेची प्रमाणपत्रे, गुणपत्रिकेच्या दोन्ही बाजूंची छायांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे. (Mark sheet & Passing Certificate)<br>• विवाहीत महिला उमेदवारांनी विवाह नोंदणी प्रमाणपत्र (Marriage Registration Certificate) / नावात बदल झाल्याबाबतचे राजपत्र (Gazette) सादर करावे. |

**कंत्राटी पध्दतीने नेमणूकीकरिता अर्ज सादर करणाऱ्या शासकीय / निमशासकीय / शासन अंगीकृत उपक्रमांमधून सेवानिवृत्त उमेदवारांकरिता (खाजगी क्षेत्रातील समतुल्य /तत्सम पदाचा अनुभव असलेले उमेदवार वगळून) विशेष सूचना :-**

| | |
|---|---|
| १. | **शासकीय / निमशासकीय / शासन अंगीकृत उपक्रमांमधून सेवानिवृत्त उमेदवारांच्या निवडीकरिता शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण - २७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ व सुधारीत शासन निर्णय क्र. संकीर्ण - २७१५/प्र.क्र.१००(भाग-१)/१३, दिनांक ०८ सप्टेंबर, २०२३ लागू राहतील.** |
| २. | उपरोक्त नमुद शासन निर्णयातील तरतुदीनुसार वेतन व भत्ते अनुज्ञेय राहतील. |
| ३. | अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी तसेच न्यायालयीन प्रकरण चालू अथवा प्रलंबित नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या शासकीय / निमशासकीय / शासन अंगीकृत उपक्रम कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे. त्या संबंधित कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील. |
| ४. | करार पध्दतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरीक, मानसिक व आरोग्याच्यादृष्टीने सक्षम असावा. तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी. |
| ५. | ज्या अधिकाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालू आहे किंवा प्रस्तावित आहे अथवा शिक्षेची अंमलबजावणी चालू आहे तसेच भ्रष्टाचार / लाचलुचपत गुन्हयांसंदर्भातील प्रकरणी फौजदारी प्रकरणी शिक्षा झालेली आहे असे उमेदवार अर्ज करु शकणार नाहीत. |

**महत्वाच्या सूचना :-**

| | |
|---|---|
| १. | प्रमाणपत्र पडताळणी :-<br>• अर्जात भरलेल्या माहितीची पडताळणी प्रमाणपत्रांवरुन करण्यात येईल.<br>• नियत दिनांकास विहित कागदपत्रे सादर करू न शकणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी याच टप्प्यावर रद्द करण्यात येईल व त्यांची मुलाखत घेतली जाणार नाही. तसेच त्याकरीता कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही याची अर्जदाराने नोंद घ्यावी.<br>• मुलाखतीसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्या मुलाखती शिपुप्रम निश्चित केलेल्या ठिकाणी घेण्यात येतील. |
| २. | विहित कालावधीत आवश्यक बाबींची पूर्तता न केल्यास उमेदवार त्याचा / तीचा हक्क गमावेल. |
| ३. | उमेदवाराचा ई-मेल आयडी आणि पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोड सह), भ्रमणध्वनीसह सुस्पष्ट, पूर्ण व वैध असावा. |
| ४. | निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराने चुकीची माहिती / प्रमाणपत्रे / कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवार कायद्यानुसार शिक्षेस पात्र ठरेल. |



Scanned with OKEN Scanner

| | |
|---|---|
| ५. | उमेदवारांना प्रमाणपत्र पडताळणीस आणि मुलाखतीस हजर राहणेसाठी कोणताही भत्ता अथवा खर्च दिला जाणार नाही. उमेदवारांना नियुक्तीच्या कार्यवाहीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. |
| ६. | शिपुप्रमने कोणत्याही व्यक्तिला व इतर दुसऱ्या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचे अधिकार दिलेले नाहीत, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. |
| ७. | सविस्तर जाहीरात, अर्जाचा नमुना व इतर नमुने www.spplmmr.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. |

**विशेष सुचना :-**

| | |
|---|---|
| १. | **अर्जदाराने पाकिटावर डाव्या बाजूला ठळक अक्षरात पदाचे नांव नमूद करावे.** |
| | **कोणतेही कारणे न देता जाहीरातीमधील रिक्त पदाच्या संख्येत बदल करणे, पदभरती स्थगित करणे/रद्द करणे व पदभरती प्रक्रिया याबाबतचे सर्व अधिकार तसेच प्राप्त अर्ज अशंता किंवा पूर्ण किंवा सर्व अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्या. राखून ठेवत आहे.** |
| | **दि.१५/०४/२०२६ रोजी दुपारी 3.00 वाजता थेट मुलाखत (Walk in Interview) मूळ कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी तपासणीसाठी सादर करणे अनिवार्य आहे.** |
| २. | विहित मुदतीनंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. |

**दिनांक : एप्रिल, २०२६**
**स्थळ : मुंबई.**

**व्यवस्थापकीय संचालक**
**शिवशाही पुनर्वसन प्रकल्प मर्या.**

D:\drive 1\SPPL 18\Meenakshi\GM श्री अशोक नाईकवाडे\जाहिरात\Final Govt Retired and Private Sector Experience Contract Bass Engg J Engg.docx

Scanned with OKEN Scanner